

REIKI VIDYA NIKETAN

सर्वेः सन्तु निरामयाः

# रेकि ब्रह्म

वर्ष ८वे अंक ११वा । ऑगस्ट २०२०

कॉरोनाच्या पडद्यामागे एका नव्या चैतन्याची सुरूवात झाली आहे. स्वामींच्या चेहऱ्यावरील प्रसन्नता या चैतन्याची झळाळी दाखवते.



संपादकिय

# फिटे अंधाराचे जाळे..

नुकतीच गुरू पौर्णिमा होऊन गेली. कोरोनामुळे या वर्षी प्रत्यक्षात हा उत्सव काही साजरा करता आला नाही. परंतु तरीही बऱ्याच ठिकाणी नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून समारंभ झाले. साधारण अशा समारोहात गुरू म्हणजे काय, आपले गुरूंविषयीचे अनुभव, वगैरे गोष्टी चर्चेला येतात. गुरू शब्दाचा अर्थ सांगणे हा अश्या समारंभातला आवडता खेळ म्हणायला हरकत नाही. 'गु' म्हणजे अंधकार आणि 'रू' म्हणजे प्रकाश आणि गुरू म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे नेणारा असे सोपे समीकरण मांडले जाते. अगदी प्रामाणिकपणे सांगायचे म्हणजे ही सामान्य माणसाची किंवा अगदी नव्यानेच साधनेच्या मार्गावर चालणाऱ्या साधकाची व्याख्या झाली. मुळातच अंधकार म्हणजे वाईट आणि प्रकाश म्हणजे चांगला हा विचार सामान्य मनातून आणि बुद्धीतून आलेला. आपल्या पंचेद्रियांना काळोखात गोष्टी समजत नाहीत, दिसत नाहीत आणि म्हणून काळोखाची परिस्थिती त्याला सुखावह वाटत नसते. प्रकाशात कसे छान दिसते. परंतु ज्येष्ठ साधकाला आपल्या इंद्रियांच्या मर्यादांच्या पलिकडे जाऊन आयुष्याच्या अनुभूती करता यायला हव्या.

अंधाराला वाईट म्हणून तसा न्याय देणे हे उचित नाही. आपले आध्यात्मिक शास्त्र आणि आजचे आधुनिक शास्त्र दोन्हीही हे जाणतात कि विश्वाचा उगमच मुळी अंधाराच्या पोकळीतून झाला आहे. "कृष्ण विवर" किंवा ज्याला इंग्रजीमध्ये "ब्लॅक होल" म्हटले जाते ते सगळ्या विश्वाची जननी आहे. अंधार हा प्रकाशाचा जन्मदाता आहे. अगदी ख्रिस्ती धर्माचा जो धर्मग्रंथ बायबल आहे त्याचे पहिले वाक्यच मुळात "आणि मग प्रकाश प्रकटला" काय सांगते? कोठून प्रकटला प्रकाश? तर अंधाराच्या काळ्याकुट्ट गर्भाशयातून. अंधार म्हणजे सगळ्या रंगांचा पूर्ण स्वीकार आहे तर प्रकाश हा सगळ्या रंगांना नाकारणारा आहे. तो सगळेच रंग परावर्तित करतो. अंधारचा काही तसे नाही. सगळ्या रंगांना प्रेमाने आपल्या पोटात साकारणारा तो अंधार. अंधार हीच आपली जननी आहे आणि त्याच जननीच्या पोटी जन्म घेऊन आपण माणसाचे रूप साकारले आहे. आपली सुरूवातच अंधारात आहे आणि मोक्षाचा अर्थच मुळी जेथून आलो तेथे जाणे असा आहे. मग हा प्रवास अंधारातून अंधाराकडे आहे. प्रकाश हा व्यक्त जीवनाचा आविष्कार आहे. ना तो उगमाचा द्योतक आहे ना गंतव्याचा.

मग गुरू काय करतो? अंधाराच्या अज्ञानातून प्रकाशाच्या पायवाटेवरून चालताना ज्ञानाचा अनुभव देतो. परंतु त्याची भूमिका तेथे समाप्त होत नाही. त्या प्रकाशाच्या पायवाटेचा अनुभव घेत घेत शेवटी गुरू पुन्हा एकदा काळोख्या आईच्या कुशीत सोडतो. हे ऐकून एखादा सामान्य साधक हडबडून जातो एवढे खरे. साधनेच्या अंतिम पायरीत, डोंगराच्या गर्द झाडीत, एखाद्या अंधाऱ्या गुहेचा शोध घेत काळ आणि स्थळाच्या पलिकडच्या मिट्ट अंधाऱ्या गुहेतच मोक्षाचे स्थान दडलेले आहे. अंधार आणि प्रकाशाच्या फेऱ्याच मारायच्या झाल्या तर 'पुनरपि जननम्, पुनरपि मरणम्' या चक्रात फिरत ठेवणारा भवसागरातच गटांगळ्या का खाऊ नयेत. सदगुरू हा जरी प्रकाश बनून जीवनात आला तरी शेवटी अंधाराच्या मिठीत आपल्या शिष्याला सोडून, त्याला सत्याचा साक्षात्कार करून देणे हे त्याचेही अंतिम ध्येय असतेच कि!

**अजित सर**

दिनांक: २१ जुलै २०२०



# कोरोनाच्या नावाने वैद्यकिय शास्त्राने घातलेला सावळा गोंधळ

कोरोनाच्या महासंकटाची सुरूवात झाल्याला आता चार महिन्यांवर होऊन गेले. अजूनही हा 'तथाकथित' विषाणू काबूत येण्याचे कोठलेच लक्षण दिसत नाही. सगळ्या जगभराची परिस्थिती पाह्यल्यानंतर लक्षात येतेय कि हे काय प्रकरण आहे हेच अजून कोणाला कळलेले नाही. इतके दिवस इतरांना होणारा हा रोग आता जवळ जवळ प्रत्येक घराच्या आसपास घुटमळताना दिसायला लागला आहे. त्यामुळे इतके दिवस एका गुप्त रहस्यामागे दडलेल्या या रोगाचे अनुभव आता आपल्याच आजूबाजूला येत आहेत. इतक्या जवळून अनुभवल्यामुळे हा रोग आणि त्याला आवर घालण्यासाठी वैद्यकिय शास्त्राचे जे काही प्रयत्न आतापर्यंत होत आहेत त्यातील फोलपणा आता उघड्यावर आलेला आहे. मला काही दिवसांपूर्वी एक मुंबईचे डॉक्टर भेटले. गेले ३४ वर्षे मुंबईच्या मध्यवर्ती भागात रुग्णालय चालवत आहेत. मी त्यांना कोरोनाबद्दल विचारले तर त्यांनी अतिशय निराशपणे मान हलवत म्हटले, "खरे सांगू, आम्हा डॉक्टरांना हा रोग समजलाच नाही. हा विषाणू नाही तर हा बॅक्टेरिया आहे असे आता आम्हाला वाटायला लागले आहे." ह्या त्यांच्या वाक्यातच सगळे काही आले. विषाणू विषाणू असा ढोल अगदी चार महिने वाजवल्यानंतर आता तो विषाणूच नव्हे इथपर्यंत आता वैद्यकिय शास्त्र घसरले आहे. जागतिक आरोग्य संघटना तर आता म्हणायला लागली आहे कि हा रोग हवेतून पसरतो याचा आमच्याकडे पुरावा आहे. हीच संघटना गेले चार महिने ठामपणे हे नाकारत होती व हा विकार फक्त स्पर्शातून पसरत आहे असे वारंवार म्हणत होती.

सामान्य माणूस तर आता कोरोनाचे आकडे वाचूनच दमला आहे. इतक्यांना लागण झाली व इतके बरे झाले आणि इतके मेले हे आता नित्याचेच झाले आहे. परंतु दोन मूलभूत गोष्टी मला अजून समजल्याच नाहीत त्या अशा : (१) लागण झाली म्हणजे काय झाले? रोग्याच्या शरीरात काय मिळाले कि कोरोनाने लागण झाली असे मानले जाते? माणसाच्या शरीरात तर तीनशेपेक्षाही जास्त विषाणु सतत जगत असतात आणि ते सगळे एकाच सारखे दिसतात. मग लागण कोरोनाने झाले ह्याला पुरावा काय? काहीच नाही. कोठलाही डॉक्टर याविषयी तुम्हाला काहीच सांगू शकत नाही हे दुर्दैव. (२) रुग्ण बरा झाला म्हणजे काय झाले? त्याला कोठली औषधे दिली कि तो बरा होतो? आणि काही औषधे दिली तर तो बरा होतो मग कोरोनावर उपचार नाहीत असे का पसरवले जातेय? जे लोक बरे झाले आणि त्यांनी जी औषधे घेतली तीच द्या ना इतरांना. का हकनाक त्यांचे बळी जात आहेत? याविषयी सुद्धा सगळेच डॉक्टर– नव्हे सगळे वैद्यकिय क्षेत्रच मूग गिळून गप्प आहे. मग खरे काय आणि खोटे काय? लहानपणी मी एक गोष्ट वाचली होती. एका राजाची. कदाचित सोलोमन नावाचा राजा होता. त्याच्या शिंप्याने त्याला एक एकदम तलम झगा शिवला होता. आणि राजाला त्याबद्दल अभिमान होता. तो दरबारात किंवा रस्त्यावर फिरताना लोकांना त्याच्या अंगावर कपडे दिसतच नव्हते. परंतु कोणीच हे राजासमोर बोलायला तयार नसायचे कारण राजाला जर ते आवडले नाही तर शिरच्छेदच व्हायचा. असे काही महिने गेले आणि एक दिवस एक लहान मुलाने राजाला पाहीले आणि तो म्हणाला, "अरे हा तर नागडा राजा" तसेच काहीसे चालले आहे. कोणीही हे म्हणायला तयार नाही कि कोरोना असे काहीच नाही. तो एक सामान्य विषाणू आहे जसे बाकीचे आहेत. फक्त त्याच्या नावाचा जो दिंडोरा पिटला जातोय आणि एक वातावरण तयार होतेय आणि त्यातून एक प्रचंड भीतिग्रस्त तणाव तयार झालाय आणि ही भीति हाच एक मोठा आजार झाला आहे. काल अमेरिकेतील टी.व्ही. चॅनेल वर एक भारतिय डॉक्टरांची मुलाखत पाहीली. हा एक मोठा सर्जन आहे. तो हताशपणे म्हणत होता, "आमचे शास्त्र हरले. कोठलाही गंभीर आजार असो आम्ही आतापर्यंत रूग्णाला वाचविण्यासाठी

पराकाष्ठा करायचो. अगदी दीड दोन महिने त्या परिस्थितीशी झुंजायचो. पण हे जे काही आहे, केवळ दोन ते तीन दिवसात आमच्या समोरून रुग्ण मृत्युच्या मिठीत शिरतो. आम्हाला काहीच करता येत नाही. आम्ही असहाय्य आहोत. आमचे शास्त्र काम करत नाही.'' हे सांगताना त्यांच्या चेहऱ्यावरची विषण्णता आपल्याला भयानक उदासिनता आणते. मग हे चालले आहे ते तरी काय? जळगावचे एक नामांकित डॉक्टर पाटील यांनी या विषयावर खूप अभ्यास केला व जगभरच्या कोरोना मृत्युचे आराखडे मागवले आणि त्यांच्या लक्षात आले कि अगदी एकाही मृत्युच्या सर्टिफिकेटवर कोरोना त्याला जबाबदार असल्याचा उल्लेख नाही. मृत रुग्णांच्या मरणाची कारणे साधारणच जसे ह्रदय विकार, मधुमेह, रक्तदाब वगैरेच आहेत. मग राजाने कपडे घातलेच नसताना त्याने काहीच घातले नाही असे म्हणायला सगळेच बिचकत का आहेत?

हा असाच खेळ खंडोबा चालू राह्यला तर माणसाने करायचे तरी काय? कसले शास्त्र? कसले विज्ञान? कसली आधुनिकता? पूर्वीच्या काळी धर्मा–धर्माने अंधश्रद्धा जोपासल्या आणि आता तेच काम आधुनिक विज्ञान करत आहे असे दिसतेय.

**अजित सर**

दिनांक: १२ जुलै २०२०

# भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे...



सध्याच्या परिस्थितीत ज्यावेळी संपूर्ण जग करोनाच्या दहशदीत आहे, तेव्हा आपण रेकि साधक मात्र स्वामी, गुरुजी आणि रेकि आईच्या आशीर्वादाने शांततेत जगत आहोत. कितीही बिकट परिस्थिती आली तरी स्वामी आपल्याला त्यातून अलगदपणे बाहेर काढतात आणि ''मै गया नही, जिंदा है'' ह्याची अनुभुती देतात, ह्याचा माझ्या परिवाराने नुकताच अनुभव घेतला.

काही दिवसांपूर्वी आमच्या आईंची तब्येत अचानक बिघडली. आधी निमोनियाचं आणि हॉस्पिटलमधे गेल्यावर करोनाचे निदान झालं. काळजी ह्यासाठी होती की आईंच वय सत्तरीतले आणि शिवाय कर्करोगाची पार्श्वभूमी. आम्ही रेकि पाठवणे सुरु केलेच होते शिवाय गुरुजींनाही ईमेल करून सगळी परिस्थिती सांगितली. गुरुजींनी सगळ्यांना रेकि पाठवायला सांगितले. जयराम सरांनी सर्व साधकांना ग्रुपवर मेसेज पाठविले. सर्वजण सातत्याने रेकि पाठवत होते.

रोज त्यांच्यांशी संपर्क साधायची परवानगी नव्हती, मात्र तिसऱ्या दिवशी हॉस्पिटलमधून आईंचा फोन आला ''आज खुपच छान वाटत आहे, श्वास घ्यायला त्रास होत नाही आहे.'' आईंच्या आवाजात सकारात्मकता जाणवत होती. दहा दिवसातच संपूर्णपणे ठीक होऊन आई घरी आल्या.

घरी आल्यावर म्हणाल्या, ''हॉस्पिटलमधे दुसऱ्या दिवशी संध्याकाळी खुपच घाबरले होते. देवाला म्हणाले, काय ते सांग जगणार की जाणार.. आणि समोर स्वामींचे पाय दिसले. नकळत हात जोडले गेले.'' नर्सने विचारले, ''आजी कोणाला हात जोडत आहात?'' मी म्हणाले, ''मला माझा देव समोर दिसत आहे; त्यालाच नमस्कार करत आहे.'' आणि त्या रात्रीपासून माझी तब्येत सुधारत गेली.

आईंचा हा अनुभव ऐकताच मीही मनोमन स्वामींचे आभार मानले. अशा प्रतिकुल परिस्थितीत सातत्याने रेकि आणि शुभेच्छा पाठविणाऱ्या गुरूजी, सर्व रेकि शिक्षक–साधक वर्ग ह्यांचे मनापासून आभार मानले.

**अर्चना परब, मुंबई.**

भक्तांकारणे अक्कलकोटी । वास केला हो निकटी ॥
पाय दाऊनिया सृष्टी । पतित उद्धार करविला ॥



# गुरुपौर्णिमा

तेजश्री रानडे, देवगड

आज गुरुपौर्णिमा... खरं तर मठातल्या गुरुपौर्णिमेची फार फार आठवण येत आहे. पण बाहेरच्या परिस्थितीमुळे मठात जाणं शक्य नाही. पण खरं सांगायचं तर अंतरमनातली परिस्थिती ही बाहेरच्या परिस्थितीहून भिन्न आहे आज. त्रिभूवनात संचार असणाऱ्या त्या आदिगुरू स्वामीरायांचं अस्तित्व आज प्रकर्षाने जाणवतय. एरवी गुरूपौर्णीमेला मठात असताना गुरूपूजन करण्याचं भाग्य मिळतं पण आज लॉकडाऊनमुळे ते भाग्य आपल्यापासून हिरावून तर घेतलं गेलं नाही ना? या विचाराने मला फार अस्वस्थ केलं. पण मग तूमचे शब्द मला आठवले. एकदा मी तुम्हाला म्हटलं होतं की, “सर मला तूमचा आवाज ऐकू येतो पण आसपास तुम्ही कुठेच नसता.” तेव्हा तुम्ही म्हणाला होतात, “अगं मी सगळीकडेच असतो.” हे तुमचं वाक्य आठवल्यावर मला धीर आला. गुरु प्रत्यक्ष नसले तरी आपल्याबरोबर सदैव असतात याची जाणीव झाली. आणि खरचं आहे की हे. केवळ रेकि शिकल्यावरच नाही तर त्या आधीही तुम्ही होतात की माझ्याबरोबर आणि त्यामुळेच माझी पावलं मठाकडे वळली. याचा मला पूर्ण विश्वास आहे. आत्तापर्यंत असे कितीतरी क्षण आले, असं वाटलं की संपलय सगळं, पुढे जाणं शक्य नाही पण तुमच्या एका एका वाक्याने सावरलंय मला आणि अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही शक्य झाल्या. यालाच गुरुकृपा म्हणतात ना? बाहेरची परिस्थिती पाहाता असं आर्ततेने वाटत आहे की, ‘आपण आपल्या गुरुच्या मांडीवर अत्यंत सुरक्षित आहोत. काहीही झालं तरीही गुरु आपला हात सोडणार नाही.’

आज तुमच्या आठवणीनी मन भरून येत आहे. पण आज डोळ्यात आलेली आसवं ही आनंदाची, कृतज्ञतेची आहेत. याच आनंदाच्या, कृतज्ञतेच्या आणि समर्पणाच्या आसवांनी आज मी गुरुंची पूजा बांधणार आहे आणि ती तुमच्यापर्यंत नक्की पोहोचेल असा विश्वास आहे. तुमच्यासाठी ही एक छोटीशी कविता...


## वाट चालवावी मोक्षाची

हृदयीच्या गाभाऱ्यात
मूर्ती श्रीगुरुंची
सुमने वाहिली चरणांवर
श्रध्दा अन् समर्पणाची ॥१॥

तुमच्या हाती माझा हात
जन्मजन्मांचीही साथ
वात्सल्याचे शिंपण होते
वसता तुम्ही अंतरात ॥२॥

भरला आनंद अस्तित्वात
शिदोरी घेतली साधनेची
येते गुरुराया तुम्हांसवे
वाट चालवावी मोक्षाची ॥३॥

**गुरुपौर्णीमेच्या खुप साऱ्या शुभेच्छा सर...**



# जादूची झप्पी

मृणाल कुटुंबळे, वडोदरा.

७ सप्टेंबर २०१९ चा दिवस. साऱ्या जगाचे लक्ष एकाच ठिकाणी होते. भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी बंगलोरच्या इस्रो सेंटर मध्ये बसून भारतीय वैज्ञानिक आणि जनतेसोबत हा अविस्मरणीय क्षण अनुभवत होते. चंद्रयान–२ मोहीमेचा महत्वाचा टप्पा होता. चंद्राच्या सपाटीपासून अवघ्या २ ते ३ कि.मी. अंतरावर असताना विक्रम लेंडरशी संपर्क तुटला. अचानक काहीच दिसेनासे झाले. थोडावेळ नि:शब्द शांतता पसरली. सर्वांच्या चेहऱ्यावरचे गंभीर भाव मोदींनी क्षणात टिपले. थोडयाच वेळात इस्रो प्रमुख श्री. के. सिवन यांनी मोदींना जे घडले त्याची कल्पना दिली. शास्त्रज्ञांना धीर देऊन मोदीजी बाहेर आले. त्यांना निरोप द्यायला इस्रो प्रमुख के. सिवन बाहेर आले आणि त्यांना दु:ख अनावर झालेले पाहून मोदींनी त्यांना सांत्वना देण्यासाठी गळाभेट घेतली. पाठ थोपटून धीर दिला. हेच अभूतपूर्व दृश्य. हीच ती ग्रेटभेट. जादूची झप्पी. आजन्म लक्षात राहतील असे क्षण. मोदींनी फक्त इस्रोप्रमुखांनाच नाही तर त्यांच्या बरोबर भावूक झालेल्या अनेक भारतीयांना दिलासा दिला. अगदी कुटुंबातल्या प्रमुखासारखे वागून भारतीयांना एक सुखद धक्का दिला. त्यावेळी ह्याच जादूच्या झप्पीची गरज होती. चंद्रयान–२ मोहिमेसाठी शास्त्रज्ञांनी किती कष्ट घेत, दिवसरात्र जागून, जन्म दिलेल्या बाळाप्रमाणे त्याचे कोडकौतुक करत त्यांच्या बाळाला मोठे केले. अचानक ते बाळ दिसेनासे झाल्यावर आईला काय वाटत असेल? त्या क्षणी वैज्ञानिकांच्या मनाची अवस्था काय असेल, ह्याची सामान्य जनतेला पुसटशी कल्पना पण असेल की नाही कोण जाणे? "संपर्क तुटला, पण संकल्प नाही" असे म्हणत त्यांनी तो क्षण हेरून सिवन यांची गळाभेट घेऊन त्यांना धीर दिला. त्यांचे मनोबळ वाढवले.

नेता असाच असावा. मग तो कुटुंबाचा, समाजाचा, राष्ट्राचा किंवा आध्यात्मिक असो. विषम परिस्थितीत स्वत:ला सांभाळून प्रजेला पण आधार देणारा असावा. लॉकडाऊनच्या काळात एकाच वेळी अनेक मोर्चे त्यांना सांभाळायचे होते आणि ते कार्य त्यांनी व्यवस्थित पार पाडले.

कोरोना विषाणू मुळे उद्भवलेल्या परिस्थितीत लॉकडाऊनच्या काळात सर्वजण आपल्याच घरात बंदिस्त झाले होते. त्या अस्थिरतेच्या, निराशेच्या, भीतीच्या काळात गुरुजींनी आपल्या साधकांना सांभाळण्याकरता ऑनलाईन झूम मिटिंगद्वारे बरेच उपक्रम राबवले. त्यांनी सांगितलेल्या दैंनदिनीच पालन करता करता साधकांचा उगवलेला दिवस अगदी आनंदात पार पडत होता. बाहेर चालू असलेल्या कोरोना विषाणूच्या थैमानावर गुरुजींनी सुरु केलेल्या ऑनलाईन साधना सप्ताहांमुळे साधकांनी मात केली. गुरुंनी आपल्या सर्व साधकांना दिलेली जादूची झप्पीच होती ती. जवळपास दोन अडीच महिने कसे गेले कळलेच नाही. रोज सर्व साधकांना ते ऑनलाईन प्लॅटफार्म वर मार्गदर्शन करत होते. साधनामार्गावर चालताना, येणाऱ्या अडचणींवर मात करायला शिकवत होते. गुरुजींनी पुढयात आलेल्या परिस्थितीसमोर सर्व साधकांना मोठे केले.

रेकि सेमिनारमध्ये आपल्याला सांगतात की दिक्षेद्वारे आपला हात भगवंताच्या हातात दिलेला आहे. तो हात धरून ठेवणे साधकाचे काम असते. गुरुंनी दाखवलेल्या मार्गावर, चालण्याचे काम साधकाचे असते. गुरु सतत वेगवेगळ्या मार्गाने साधकाचे मार्गदर्शन करत असतात. कधी बोलून तर कधी तसे वागून. कोणत्या वेळी कुठल्या शिष्याला कशाची

गरज आहे हे गुरुंना माहित असते, अगदी आईसारखेच. म्हणून तर त्यांना गुरुमाऊली म्हणतात. मात्र शिष्याने त्याची भूमिका व्यवस्थित पार पाडणे आवश्यक आहे. गुरुंच्या संकल्पात किंवा कार्यात मदत करणे शिष्याचे कर्तव्य आहे. गुरु शिष्याच्या उत्कर्षासाठीच हे सर्व करत असतात. गुरु महानच असतात, त्यांची योग्यता आणि महानता शिष्याच्या यशावर अवलंबून नाही.

ज्यांनी गुरुंचा अपमान केला त्यांना त्यांच्या कर्माची फळे मिळाली. जलंधरने साक्षात पार्वतीमातेचे अपहरण केल्याचे कळल्यावर दैत्यगुरु शुक्राचार्यांनी त्याला समजावले की, "तू साक्षात आदिशक्तीचे अपहरण करून मृत्यूला आमंत्रण दिले आहेस. तिला सन्मानासह परत सोडून ये." जलंधरने तसे केले नाही. शुक्राचार्यांचा अपमान केला. मृत्यू समोर असताना त्याने महादेवांना विचारले की, "मी तुमचा अंश होतो तर मला गणेश आणि कार्तिकेयासारखे प्रेम का दिले नाही? माझ्या डोक्यावर मायेचा हात का ठेवला नाही? मला तुमच्यापासून दूर का ठेवले?" तेव्हा महादेव म्हणाले, "मी तुला कधीच माझ्यापासून वेगळे केले नाही. अंश कधीही त्याच्या मुळापासून दूर राहू शकत नाही. तुला वेळोवेळी मी संकेतांद्वारे मार्गदर्शन द्यायचा प्रयत्न केला पण तुझ्या अहंकारामुळे तू ओळखू शकला नाहीस. समुद्राच्या लाटा उसळतात. त्यांना पण सुख-दु:खे असतात, ती समुद्राचीच असतात. लाटा समुद्रापासून कधी वेगळ्या होऊ शकत नाहीत. पण लाटा समुद्राचा अंश आहेत, पर्याय नाही. तू कधीच एकटा नव्हतास. वेगवेगळ्या रुपात मी तुझ्या जवळच होतो. तुझ्या मस्तकावर हात ठेवायची गरज भासली नाही कारण मी कधी तुला माझ्या मांडीवरून खाली उतरवलेच नाही."

गुरूंचा अंश साधकांमध्ये रुजलेला असतो. वेगवेगळ्या मार्गांनी ते सतत साधकांचे मार्गदर्शन करत असतात. साधकाने अंहकार सोडून गुरुंचा आवाज ऐकण्याचा प्रयत्न करायला हवा. साधकांना काही प्रश्न असतील, कष्ट असतील तर गुरुंचे स्मरण केल्याबरोबर त्यांना प्रश्नांचे उत्तर मिळते. मार्ग मिळतो. गुरु सतत आपल्याबरोबर आहेत अशी श्रध्दा आणि विश्वास असायला हवा. हीच तर गुरूंनी साधकांना दिलेली जादूची झप्पी आहे. नाही का?



# गुरुकृपा



ही गुरुचीच कृपा मला माहीत
आम्ही स्वामींच्या कृपेत ।

करपत्या उन्हात झोंबणाऱ्या वाऱ्यात
साहले मुकाट... आम्ही स्वामींच्या छायेत ।

रुसवे फुगवे किती भांडलो कसे किती
वागलो खुळ्यागत... आम्ही स्वामींच्या नजरेत ।

आली किती वादळे पोळलो वणव्यात
परस्परा सांभाळीत... आम्ही स्वामींच्या कृपाछत्रात ।

संसार चालला सुखात
प्रेम प्रगती प्रपंचात... आम्ही स्वामींच्या आशिर्वादात ।

नांदतो आम्ही मातापित्यांच्या पुण्याईत
जन्मोजन्मीचे भाग्य... आम्ही स्वामींच्या सान्निध्यात ।

ठेव असेच देवा आमुचे जीवित
उरले सुरले सारे तुझ्या भक्तीत ।

स्वर्ग नि मुक्ती नाही काही जाणत
घडो सेवा स्वामी तुझी, जोवरी प्राण जिवात ।

वामनसूत

अमृतधारा

# गुरुपौर्णिमा

## कृतज्ञता काव्य





सरला ज्येष्ठ, आषाढाचा महिना
गुरुतत्व स्पदंने आज व्यास पूर्णिमा.. ॥१॥

संचाराची बंधने गेले कितीक दिवस
मन चातक पक्षी लागे गुरु दर्शनाची आस... ॥२॥

सुखदु:खाच्या लाटा जीव बहु हेलकावे
स्वामी तूचि माता बालकास कवटाळावे... ॥३॥

संध्येस पौर्णिमेच्या लागली चांदण्याची चाहूल
होता प्रारंभ पूजन दिसले गुरुचे पाऊल...॥४॥

माझ्या गुरुचे मुखी पूनव चंद्राचीच प्रभा
डोळ्यात प्रेम करूणेचा निर्झर काय वर्णू ती आभा... ॥५॥

कृतज्ञता आणि शब्द मायेचे शिष्यांचे मनोगती
कसे होऊ उतराई हेच बोल पुन: पुन: येती.. ॥६॥

कुणी अर्पिती स्वरांजली कुणी शब्दातून भावना
सद्‌गदित आसमंत जागती संवेदना... ॥७॥

गुरु येती मग साधण्या संवाद
उच्चतम तो उसळे मनी प्रमोद.. ॥८॥

गुरुकृपा कटाक्षे मोदांकित जाहलो
पूनव चंद्र उगवे ज्ञानाचा, चांदण्यात नाहलो... ॥९॥

**सौ. गिरिजा जोगळेकर, डोंबिवली**
०६ जुलै २०२०.



# वाह गुरु वाह... गुरु म्हणजेच गुरु !

**सारिका पांडे**

तो धिटाईने वृध्द गुरुंसमोर उभा होता. गुरु त्यांच्या अनुभवी नजरेने त्याचे निरिक्षण करत होते. कोवळं वय. असेल साधारण नऊ – दहा वर्षाचा. त्याला डावा हातच नव्हता. एका अपघाताने तो हिरावून घेतला होता म्हणे.

"तुला माझ्याकडून काय हवे आहे?" गुरुने त्या मुलाला विचारले.

"सर, मला तुमच्याकडून ज्युडो–कराटेची विद्या शिकायची आहे."

शरीराला एक हातच नाही आणि ज्युडो शिकायचं आहे? अजब मुलगा दिसतोय.

"कशाला?"

"शाळेत मला मुलं त्रास देतात. थोटक्या म्हणून चिडवतात. मोठी माणसं नको तितकी कीव करतात. मला त्यांच्या या वागण्याचा त्रास होतो. मला माझ्या हिमतीवर जगायचंय. कोणाची दया नको. हात नसताना मला माझं रक्षण करता आलं पाहिजे."

"ठीक! पण मी आता तो 'शिक्षण' देणारा गुरु राहिलो नाही. मी आता वृध्द झालोय आणि आत्मचिंतनात मग्न असतो. तुला माझ्याकडे कोणी पाठवलं?"

"सर, मला एक हात नसल्याने खूप जणांनी त्यांचा 'विद्यार्थी' म्हणून नाकारलं. त्यातल्याच एकाने तुमचे नाव सांगितले. 'तुला फक्त तेच शिकवू शकतील. कारण त्यांना खूप वेळ असतो आणि त्यांच्याकडे एकही विद्यार्थी नाही' असे ते म्हणाले होते."

तो उन्मत्त शिक्षक कोण हे गुरुंनी तात्काळ ताडले. अशा अहंकारी माणसांमुळेच ही विद्या गुंड प्रवृत्तीच्या हाती गेली, ह्याचे त्यांना नेहमीच वाईट वाटे.

"ठीक आहे. आजपासून तुला मी माझा 'शिष्य' करून घेत आहे. या शिष्यत्वाचे नियम तुला आज पहिल्यांदा आणि शेवटचे सांगतो. लक्षात ठेव. आपल्या गुरुवर पूर्ण विश्वास ठेवायचा. मी माझ्या लहरीप्रमाणे शिकवीन ते शिकून घ्यायचे. ज्युडो–कराटे ही खूप घातक विद्या आहे. तिच्यामुळे एखाद्याचा जीव जाऊ शकतो. म्हणून ही विद्या फक्त आत्मरक्षणासाठीच वापरायची. नेहमी नम्र रहायचे. समजले?"

"हो सर. समजले. मी आपल्या या आज्ञांचे पालन करीन."

मुलाने गुरुच्या पायावर डोके ठेवले आणि आपल्या एकुलत्या एक शिष्याच्या शिक्षणास त्यांनी आरंभ केला.

एकच डाव गुरुंनी त्याला शिकवला आणि तोच ते त्याच्याकडून करून घेऊ लागले. सहा महीने हेच चालू राहीले. एक दिवशी मुलाने गुरुचा चांगला मूड बघून हळूच विषय काढला.

"सर, सहा महीने झालेत. एकच मूव्ह तुम्ही माझ्याकडून करून घेत आहात. नवीन डाव असतीलच ना?"

"आहेत. अनंत डाव आहेत. ते आत्मसात करायला, तुला तुझं आयुष्य कमी पडेल. पण तुला मी शिकवतो आहे, त्याचीच गरज आहे आणि इतकेच तुझ्यासाठी पुरेसे पण आहे."

गुरुवचनावर विश्वास ठेवून तो शिकत राहीला.

बरेच दिवसानंतर ज्युडोचे टुर्नामेंट जाहीर झाले. गुरूंनी आपल्या एकमेव शिष्य यात उतरवला.

पहीले दोन सामने त्या शिष्याने सहज जिंकले.

पहाणारे आश्चर्यचकित झाले. एक हात नसलेला मुलगा जिंकलाच कसा? कोण गुरु असावा?

तिसरा सामना थोडासा कठीण होता. पण त्या मुलाच्या सफाईदार आणि वेगवान हालचालींनी तोही सामना त्यानेच जिंकला.

आता त्या मुलाचा आत्मविश्वास बळावला. आपणही जिंकू शकतो ही भावना त्याला बळ देत होती. बघता बघता तो अंतिम सामन्यात पोहचला.

ज्या शिक्षकाने, त्या मुलास वृध्द गुरुकडे पाठवले होते, त्या अहंकारी माणसाचा शिष्यच, त्या मुलाचा अंतिम फेरीतील प्रतिस्पर्धी होता.

प्रतिस्पर्धी त्या मुलाच्या मानाने खूपच बलवान होता. वयाने, शक्तीने, अनुभवाने सर होता. या कोवळ्या वयाच्या पोराला तो सहज धूळ चारणार हे स्पष्ट दिसत होते. पंचानी एकत्र येऊन विचार केला.

“हा सामना घेणे आम्हास उचित वाटत नाही. कारण प्रतिस्पर्धी विजोड आहेत. एक बलवान आणि एक दिव्यांग आहे. हा सामाना मानवतेच्या आणि समानतेच्या दृष्टीकोनातून आम्ही थांबू इच्छितो. प्रथम जेतेपद विभागून देण्यात येईल. अर्थात दोन्ही प्रतिस्पर्धी यास तयार असतील तरच.” मुख्य पंचाने आपला निर्णय जाहीर केला.

“मी या चिरगुट पोरापेक्षा श्रेष्ठ आहे यात दुमत असण्याचे कारण नाही. हे सगळ्यांना स्पष्ट दिसतच आहे. तेव्हा मला विजेता आणि या पोराला उपविजेता म्हणून घोषित करावे.” तो प्रतिस्पर्धी उर्मटपणे म्हणाला.

“मी लहान असेन. तरी मला हे टाकलेले उपविजेतेपद नको आहे. माझ्या गुरुंनी मला प्रामाणिकपणे लढण्याचे शिक्षण दिलेले आहे. मी ठरलेला सामना खेळून जे माझ्या हक्काचे पद आहे ते स्वीकारीन.” त्या लढवय्याचे उत्तर ऐकून उपस्थितांनी टाळ्याचा कडकडाट केला.

जाणकारांच्या कपाळावर मात्र आठया पडल्या. कारण हे ओढावून घेतलेले संकट होते. थोडे कमी जास्त झाले तर? आधीच एक हात नाही अजून एखादा अवयव गमावला जायचा. मूर्ख मुलगा!

सामना सुरु झाला. आणि सगळी मंडळी आश्चर्याने स्तिमित झाली.

त्या एका अनमोल क्षणी त्या अपंग मुलाची जीवघेणी थ्रो केलेली कीक, त्या बलवान प्रतिस्पर्ध्याला चुकवता आली नाही. तो रिंगणाबाहेर फेकला गेला. परफेक्ट थ्रो, परफेक्ट टाईमिंग. नेमका लावलेला फोर्स. अप्रतिम! केवळ अप्रतिम!!

गुरुगृही पोहचल्यावर, त्या मुलाने आपल्या उजव्या हातातील विजयाची ट्रॉफी गुरुजींच्या पायाशी ठेवली. त्यांच्या पायावर डोके ठेवून आपली पूज्य भावना व्यक्त केली.

“सर, एक शंका आहे. विचारू?”

“विचार”

“मला फक्त एकच डाव/मूव्ह येते. तरीही मी कसा जिंकलो?”

“तू दोन गोष्टीमुळे जिंकलास.”

“कोणत्या, सर?”

“एक, तू घोटून न कंटाळता केलेला सराव. त्यामुळे तुझा तो डाव ‘सिध्द’ झाला आहे. आत्मसात झाला आहे. त्यात चूक होणे अशक्य आहे.”

“आणि दुसरे कारण?”

“दुसरे कारण हे त्याहून महत्वाचे आहे. प्रत्येक डावाचा एक प्रतिडाव असतो. तसाच या डावाचाही एक उतारा डाव आहे.”

“मग तो माझ्या अनुभवी प्रतिस्पर्ध्यास माहीत नव्हता का?”

“तो त्याला माहीत होता, पण तो हतबल झाला. कारण, या प्रतिडावात, हल्ला करणाऱ्या प्रतिस्पर्ध्याचा डावा हात धारावा लागतो.”



आता तुम्हाला समजले असेल की, एक सामान्य, एक हात नसलेला मुलगा कसा जिंकला?

ज्या गोष्टीला आपण आपली कमजोरी समजतो, तिलाच जो आपली शक्ती बनवून जगायला शिकवतो, विजयी व्हायला शिकवतो, तोच खरा गुरु!

आतून आपण कोठेना कोठे ‘दिव्यांग’ असतो, कमजोर असतो. त्यावर मात करून जगण्याची कला शिकवणारा ‘गुरू’ हवा...



(लेखांक ११)

## जाहल्या स्वामीराज वैद्य, व्याधी पळे आपणची...

# शंकरराव राजेंचा ब्रह्मसंबंध उतरवला

संकलक: अवनिश चिरमुले

शंकरराव राजे ब्रह्मसमंध नावाच्या आजाराने ग्रस्त होते. त्यांनी बऱ्याच नामांकित डॉक्टरांचा सल्ला घेतला परंतु कोठलाच डॉक्टर त्यावर काही उपाय करू शकला नाही. श्री स्वामी समर्थांचे नाव त्याकाळात दुमदुमत होते. त्यामुळे त्वरेने ते गाणगापूरला गेले. त्यांना स्वप्न दृष्टांत झाला कि स्वामींनी अक्कलकोटात बोलावले आहे. त्याशिवाय आजार बरा होणे कठीण आहे. ताबडतोब शंकरराव अक्कलकोटास गेले.

ते जेव्हा अक्कलकोटास पोहोचले त्यावेळेला स्वामी निजले होते. मग शंकररावांनी सुंदराबाईंना भेटले व आपल्या भेटीचा उद्देश् सांगितला. सुंदराबाईंनी सगळे ऐकून घेतले व आपण स्वामींशी याबाबतीत बोलू असे सांगितले. परंतु त्याबद्दल काहीतरी द्यावे लागेल असेही त्यांना सांगितले. आपण त्याबद्दल १०,००० रूपये देऊ असे शंकररावांनी त्यांना सांगितले. सुंदराबाईंचा विश्वासच बसेना. स्वामींना जेव्हा शंकररावांच्या आजाराबद्दल समजले त्यावेळेला स्वामींनी एक अतर्क्य गोष्ट केली. ते ताडताड उठले आणि शेजारच्या शेख नूराच्या दर्ग्याच्या मागच्या बाजूस असलेल्या मुसलमान दफनभूमीत गेले. तेथील एका उघड्या थडग्याच्या एका खाचीत स्वामींनी स्वत:ला झोकून दिले. हे पाहून सेवेकरी शंकररावांना म्हणाले, “चला, तुमचा विकार आता गेला असेच समजा.”

बरे झाल्यावर शंकरराव वचन दिल्याप्रमाणे रु १०,००० घेऊन स्वामींकडे आले स्वामींनी त्यांना गावाबाहेर चुनेगच्ची येथील जागेत मठ बांधायला सांगितला. त्याप्रमाणे पुढील काही काळातच तेथे मठ बांधून तयार झाला. आज त्याच ठिकाणी रायराजे मठ दिमाखाने उभा आहे. राय राजांनी (शंकरराव) स्थापित केलेल्या विश्वस्त संस्थेतर्फेच त्याची देखभाल आजही केली जाते.

(संदर्भ: अक्कलकोटनिवासी स्वामी समर्थ महाराज चरित्र, लेखक: कै गणेश बल्लाळ मुळेकर)



(भाग ३३वा)

# तेलंग स्वामी

## एक अद्भुत अस्तित्व

**अनुवादक – सौ. शुभदा गर्गे, नाशिक**

आता उमाचरण विचार करू लागले की काय केले म्हणजे थांबता येईल. खूप विचार करून त्यांनी मंगलदासांना चार रुपये व गवळ्याला दोन रुपये देऊन सांगितले, "कृपा करून मला येथून जायला सांगू नका." दोघेही खूष झाले. पण मंगलदास म्हणाले, "जर बाबांनी तुम्हाला थांबण्यास मनाई केली तर माझा नाईलाज आहे. मला त्यांचे म्हणणे ऐकावेच लागेल." गवळी म्हणाला, "त्यावेळी मी येथून निघून जाईन." यानंतर उमाचरण खांबाजवळ जाऊन उभे राहीले. काही वेळात ते प्रश्न विचारणार एवढयात एक विचित्र घटना घडली.

कलकत्याचे दोन बंगाली इसम आश्रमात आले. स्वामीजींना नमस्कार करून ते उभे राहीले. काही वेळाने स्वामीजींनी त्यांना बाहेर जाण्यास सांगितले. एक जण जो विनयशील होता तो लागलीच जायला निघाला, दुसरा मात्र निराश होऊन म्हणाला, "मी लागलीच जाणार नाही. दर्शनाला आलो आहे, रहायला नाही. थोडा वेळ थांबून जाणारच आहे."

यावर स्वामीजींनी मंगलदासांना खुणेनेच सांगितले की गवळ्याला सांगून ह्याला बाहेर काढ. गवळ्याने त्याला धक्का देत बजावले, "लवकर निघा. स्वामीजींचे दर्शन घ्यायला आला होतात, ते झाले. आता येथे उगीच गर्दी करू नका." यावर गवळ्याला धक्का देत तो माणूस म्हणाला, "मी जाणार नाही. जायचे असेल तर तुम्ही जा."

दोघेही आपसात भांडु लागले. स्वामींनी त्या माणसाला व मंगलदासांना जवळ बोलावले व भींतीवर लिहिलेल्या संस्कृत श्लोकाकडे बोट दाखवून मंगलदासांना ते वाचून दाखविण्यास सांगितले. मंगलदास त्या श्लोकाचा अर्थ समजावून सांगू लागले.

मंगलदास म्हणाले, "तुम्ही तुमचे १८ रु.चे जोडे बाहेर काढून आत आला आहात. ते जोडे जर कोणी चोरुन नेले तर अनवाणी परत जावे लागेल. तुम्ही हाच विचार करीत आहात. आता सांगा तुम्ही मला बघता आहात की स्वत:चे जोडे? खरे सांगा काय विचार करता आहात? तुम्हाला काळजी करायची काहीही गरज नाही, तुमचे जोडे अजून कोणी चोरले नाहीत तेव्हा तुम्ही आता निघा."

उपस्थित सर्व लोक हे ऐकून चकितच झाले. उमाचरणजींनी बंगाली बाबूला विचारले. "तुम्ही खरेच तुमच्या जोडयांचा विचार करत होतात का?" ते म्हणाले, "हो, खरोखरीच मी माझ्या जोडयांचाच विचार करीत होतो." उमाचरणजी आश्चर्यचकित झाले. त्यांनी यापूर्वी असे काही पाहीले किंवा ऐकले नव्हते. तेलंगस्वामीबद्दलची त्यांची श्रध्दा आधिकच दृढ झाली. त्यांनी मनाशी निश्चय केला की कितीही अपमान झाला तरी येथे येणे सुरुच ठेवायचे.

यानंतर स्वामीजींनी जायची खूण करताच बंगाली बाबू निघून गेले. काही वेळानंतर स्वामीजींनी उमाचरणजींना पण निघण्यास सांगितले. उमाचरणजींना थांबायची इच्छा होती, पण त्यांचे धाडस झाले नाही व ते घरी परत गेले.

सलग बारा दिवस हे असेच सुरु राहिले. उमाचरणजींना तेथे बसायला देखील मिळाले नाही. ते निराश होऊन विचार करू लागले, "किती मी अभागी! एका साधूजवळ बसण्याची माझी लायकी नाही. मला बघताच घालवून दिले जाते. माहित नाही किती पाप केले आहे?"

तेराव्या दिवशी उमाचरणजींना दु:खावेगाने रडू कोसळले. दोन्ही डोळ्यातून अश्रू वाहू लागले. हे बघून तेलंग स्वामींनी त्यांना बसायला सांगितले व रडणे थांबवण्यास सांगितले. हे ऐकताच त्यांचा आवेग अधिकच वाढला व ते स्वामीजींचे पाय पकडून रडू लागले. त्यांची अवस्था बघून स्वामीजींनी मंगलदासांना खुणेने सांगितले, "याला आत्ता जायला सांग व उद्या सकाळी परत यायला सांग."

मंगलदासानी हा आदेश सांगताच, "परत येण्यास सांगितले हे ऐकून उमाचरणजी आनंदले. त्यांना जाणवले की त्यांची इच्छा पूर्ण होणार. ते घरी जाऊन आतुरतेने सकाळ होण्याची वाट बघू लागले.

क्रमश:





# तपस्येचे फळ आणि सदगुरू..

भृगु ऋषिंची ही कथा आहे. त्यांचा एक शिष्य होता. तो चांगला साधक होता पण त्या साधनेने आपल्याला प्रचंड दौलत मिळावी ही त्याची आंतरिक इच्छा होती. श्रीमंत होण्याच्या लालसेने त्याने आपल्या गुरूंकडून श्री महालक्ष्मी देवीला प्रसन्न करण्याची साधना शिकून घेतली. श्रीमंती प्राप्त करून घेणे हे एकच ध्येय त्याने डोळ्यांसमोर ठेवले आणि कठोर तपस्या केली.

काही वर्षे लोटली आणि त्याच्या तपस्येने देवी महालक्ष्मी प्रसन्न झाली आणि तिने ह्या शिष्याला विचारले, "तुझी तपस्या सफल झाली आहे. तुला काय वर देऊ?" अपेक्षेप्रमाणे घडल्यामुळे तो शिष्य फारच खूष झाला व त्याने देवीला सांगितले कि, "मला श्रीमंत करून टाक. मला सोने, नाणी, रत्ने हे सर्व हवे आहे." देवीने त्याला सांगितले कि "मला ज्याने आपल्या साधनेने प्रसन्न केले त्याच्यावर मी सोन्या-रूप्याची, रत्नांची बरसात करते. तसेच मी तुझ्यावर करीन. परंतु हे करण्याआधी मला त्या शिष्याच्या गुरूची परवानगी घ्यावी लागते. त्यामुळे तू तुझ्या गुरूंचे स्मरण कर आणि त्यांना येथे प्रकट होण्याची विनंती कर."

शिष्याने मन:पूर्वक प्रार्थना केली व आपल्या गुरूंचे स्मरण केले. त्याचे गुरू भृगु ऋषि प्रकट झाले आणि त्यांनी देवी महालक्ष्मीला नमस्कार केला. देवीने त्यांना सांगितले कि "तुमच्या ह्या शिष्याने त्याच्या तपस्येने मला प्रसन्न केले आहे आणि त्याच्यावर सोन्या-रूप्याची वर्षा करण्याचे मी ठरविले आहे. परंतु त्यासाठी एक गुरू म्हणून मला तुमची परवानगीची गरज आहे".

भृगु ऋषिंनी हे ऐकून पुन्हा एकदा नम्रतापूर्वक नमस्कार करून ते देवीला म्हणाले, "त्याने प्रखर तपस्या करून तुम्हाला प्रसन्न केले आहे आणि त्याचे फळ तुम्ही त्याला देण्याचे ठरविले आहे हे तर उचितच आहे. त्यामध्ये मी काहीच हस्तक्षेप नाही करू शकत. त्याला त्याच्या तपस्येचे फळ मिळायला हवेच. परंतु देवी, त्याला त्याचे फळ आताच मिळाले तर कदाचित त्याचे नुकसान होऊ शकते. तर ते फळ त्याला आताच न देता मी सांगिन तेव्हाच द्यावे अशी विनंति मला करायची आहे." देवीने त्यांना सांगितले कि तसेच होईल.

बरीच वर्षे वाट पाहून आपल्या श्रीमंतीची वेळ काही येत नाही असे समजून त्या शिष्याला वैराग्य आले आणि त्याने सरळ पर्वतातील गुहेची वाट धरली. काही महिने गुहेत तपस्या केल्यावर अचानक त्याचे गुरू तेथे प्रकट झाले आणि त्यांनी देवी महालक्ष्मीचे आवाहन केले आणि देवीच्या आगमनानंतर त्यांनी तिला सांगितले कि ह्या शिष्याला त्याच्या तपस्येचे जे फळ द्यायचे होते ते आताच द्यावे. देवीने तथास्तु म्हणून गुहेच्या सर्व बाजूंना सोन्या-माणकांचा वर्षाव केला. आतापर्यंत पूर्ण वैरागी झालेल्या शिष्याने निराशेने मान हलवली व त्या प्रचंड वैभवाकडे ढुंकुनही पाह्यले नाही. भृगु ऋषि त्याला म्हणाले, "हे बघ, तुला त्याच वेळेला हे सारे मिळाले असते तर तुझी साधना तेथेच समाप्त झाली असती व तू साधनेच्या मार्गापासून ढळला असतास."

**तात्पर्य: गुरूला नेहमीच ज्ञात असते कि आपल्या शिष्यासाठी योग्य काय आहे आणि तो आपल्या शिष्याला साधनेच्या मार्गापासून ढळू देत नाही.**

# स्वामी विवेकानंद आणि ध्यान




**लेखांक ६वा**

**अनुवादक : श्री प्रांजल जोशी, पुणे**

## योगी पुरुषाची लक्षणे

(टीप – येथे पुरुष हा शब्द लिंग वाचक नसून 'व्यक्ती' या अर्थी योजलेला आहे, धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे चारी पुरुषार्थ यशस्वी करणारा अथवा करणारी व्यक्ती)

**तर, या योगी पुरुषाची लक्षणे कोणती?**

"जो कोणाचाही द्वेष, मत्सर वा तिरस्कार करीत नाही,
जो सर्वांचा मित्र, सखा, सोबती आहे,
ज्याच्याकडे सर्वांप्रती दयाभाव आहे,

ज्याचे स्वत:चे असे काहीच नाही,

जो अहंकार विहीन आहे,

जो सुखात आणि दु:खात समभावी (स्थितप्रज्ञ) आहे,

जो सहनशील आहे आणि सदैव समाधानी आहे,
ज्याचे प्रत्येक कार्य परमेश्वरी इच्छेनुरुप आहे,
ज्याचे मन, बुध्दी, इंद्रियादि भावना स्वत:च्या नियंत्रणात आहेत, ज्याचे विचार दृढ आहेत,

ज्याचे चित्त सदा सर्वकाळ परमेश्वराला अर्पण आहे,

ज्याच्यापासून इतर कोणालाही पीडा वा अपाय नाही आणि इतर कोणाचा त्रास वा अपाय ज्याला होऊ शकत नाही,

जो मोह, क्रोध, भिती आणि चिंता यापासून पूर्णपणे मुक्त आहे,

असा तो माझा प्राणसखा, जो शुध्द आहे, सक्रिय आहे, अन कशावरही विसंबून नाही.

जो हे चांगले अन ते वाईट अशा निरर्थक खेळात पडत नाही, अन त्यामुळेच कधीही दीन, दु:खी वा कष्टी होत नाही,

ज्याचे कोणतेच कार्य स्वत:साठी नसते,

जो प्रशंसा होवो अथवा निंदा, दोहोंमध्ये अढळ अन निश्चयी आहे,

जो शांत आणि विवेकी आहे,

जो स्वत:च्या वाटयाला जे काही येईल, ते प्रसाद म्हणून स्विकारतो,

ज्याच्यासाठी "हे विश्वची माझे घर" हा अनुभव आहे,

असा तो माझा परम भक्त, तोच खरा योगी पुरुष, पुरुषोत्तम आहे.

## शिंपल्यातला मोती!

तुम्हाला माहीत आहे मोती शिंपल्यात कसा तयार होतो? एक खूप जुनी आख्यायिका आहे.

त्या नुसार सूर्य स्वाती नक्षत्रात असताना जो पाऊस पडतो, त्या पाऊसाचा थेंब जर नेमका शिंपल्यात पडला तरच त्यातून मोती तयार होतो.

विशेष म्हणजे हे त्या शिंपल्याला माहित असते आणि म्हणून तो शिंपला सूर्य स्वाती नक्षत्रात आल्यावर समुद्राच्या पृष्ठभागावर येतो अन, पावसाच्या त्या एका अमूल्य थेंबाची प्रतीक्षा करतो.

ज्या क्षणी त्याला तो पावसाचा थेंब गवसतो, तसा तात्काळ तो शिंपला आपल्या दोन्ही पाकळ्या मिटून घेतो आणि खोल समुद्राच्या तळाशी जाऊन संयमाने त्या पाणाच्या थेंबाचा अमूल्य मोती बनवितो.

आपणही त्या शिंपल्यासारखेच असले पाहिजे.

प्रथम आपल्याला शिकविलेले लक्षपूर्वक ऐकून, मग ते नीट समजून घेतले पाहिजे, अन एकदा का ते समजले. की मग मात्र, मनाला सर्व बाह्य प्रलोभनांपासून परावृत्त करून एकनिष्ठपणे आपल्यातल्या त्या अंतिम सत्याला जाणले पाहिजे.

## संयम अन सबुरी !

नारद मुनींची एक कथा आहे. ज्याप्रमाणे, मानवजातीमध्ये महान ऋषी आहेत, महान योगी आहेत, तसेच देवतांमध्येही आहेत. नारद हे त्यापैकीच एक ! त्यांना 'देव ऋषी नारद' असे देखील म्हणतात. या नारद मुनींचा सर्वत्र, सर्व लोकांमध्ये मुक्त संचार असतो. असेच एके दिवशी, नारद मुनी एका जंगलातून जात होते. तिथे एक तपस्वी पुष्कळ काळ तपस्या करीत होता, इतका की त्याच्या सभोवती मुंग्यांनी वारूळ तयार केले होते.

त्या तपस्व्याने नारद मुनींना पाहिले आणि विचारले, "हे देव ऋषी नारद, तुम्ही कोठे जात आहात?" नारदांनी उत्तर दिले, "मी जात आहे स्वर्ग लोकात, भगवान विष्णूंना भेटायला". हे उत्तर ऐकताच, तो तपस्वी दीनवाणीने म्हणाला, "मग कृपा करून, त्या परमेश्वराला माझा प्रश्न विचाराल? केव्हा माझी तपस्या सफल होईल? केव्हा तो माझ्यावर दया करेल? अन केव्हा मला मुक्ती मिळेल?"

नारदाने सांगितले. "हो, मी नक्की विचारेन".

आणखी पुढे गेल्यावर नारद ऋषींनी, एक दुसरा माणूस पाहिला, तो आनंदी होता, अन आनंदाने उडया मारत होता, गात होता, नाचत होता. त्यानेही नारद मुनींना विचारले, "तुम्ही कोठे जात आहात?" अन नारदाने. "मी स्वर्गात जात आहे." असे सांगताच तो म्हणाला, "मग कृपया विचाराल त्या परमेश्वराला की मला केव्हा मोक्ष मिळेल ते?" नारदाने होकारार्थी मान डोलावली आणि ते स्वर्गलोकात निघून गेले.

परतीच्या प्रवासात, पुन्हा तो तपस्वी मनुष्य ज्याच्या सभोवती मुंग्यानी वारूळ तयार केले होते, नारद मुनींना दिसला. नारदाला पाहताच तो म्हणाला, "हे नारद ऋषी, तुम्ही माझ्याबद्दल देवाला विचारलेत का? काय उत्तर दिले देवाने माझ्या प्रश्नाचे? केव्हा मला मुक्ती मिळेल असे देवाने सांगितले?

नारद उत्तरले, "हे मनुष्या, तुझी तपस्या चालू ठेव. देवाने मला सांगितले की आणखी चार जन्मांनंतर तुला मुक्ती मिळेल."

हे उत्तर ऐकताच त्या मनुष्याने आक्रोशाने टाहो फोडला. "हे परमेश्वर, मी एवढी घोर तपस्या केली की मुंग्यांनी माझ्या सभोवती वारूळ तयार केले. अन तरीदेखील आणखी चार जन्मांची प्रतीक्षा?"

काही काळाने नारद मुनींना तो दुसरा मनुष्य देखील दिसला. त्यानेही विचारले. "हे नारदा, काय उत्तर दिले देवाने माझ्या प्रश्नाचे? मला मुक्ती कधी मिळेल?"



नारद मुनी म्हणाले, "तुला समोर ते चिंचेचे झाड दिसत आहे का? त्या झाडाला जेवढी पाने आहेत, तितके वेळा तुला जन्म घ्यावा लागेल, मगच तुला मुक्ती मिळेल."

हे उत्तर ऐकून तो मनुष्य आनंदाने नाचू लागला; म्हणाला, "एवढया जन्मांनंतर मला मुक्ती मिळणार हे निश्चित, वा !"

तेवढयात एक आकाशवाणी झाली, "माझ्या प्रिय मुला, तुला आत्ताच, या क्षणालाच मुक्ती मिळाली आहे." त्या मनुष्याने दाखविलेल्या चिकाटीचे ते बक्षिस होते. तो मुक्ती मिळण्यासाठी अगणित जन्म देखील आनंदाने घ्यायला तयार होता.

अगणित जन्म घ्यावे लागतील, असे नारदाने सांगितलेले एवढे भयंकर उत्तर, त्याला त्याच्या लक्षापासून किंचितदेखील विचलित करू शकले नाही.

अध्यात्मात त्यामुळेच संयमाला अनन्यसाधारण महत्व आहे.

(क्रमश:)

# आश्रम वार्ता

## (१) गुरुपौर्णिमा उत्सवः

दरवर्षी ज्या उत्सवाची सर्वजण आतुरतेने वाट पहात असतात तो गुरुपौर्णिमा उत्सव ह्या वर्षीही उत्साहात साजरा केला गेला. परिस्थिती जशी असेल तसे आपण स्वत:ला बदलले पाहीजे ही गुरुजींची शिकवण सर्वांनी स्विकारली आहे हे ह्या ऑनलाईन झालेल्या उत्सवाने सिध्द केले. ४०० साधकांच्या साक्षीने, गुरुपूजनाच्या कार्यक्रमाने ह्या उत्सवाची सुरुवात झाली. ठाण्याच्या साधकांनी अजित गुरुजी आणि माई ह्यांची पाद्यपूजा करून त्यांचे औक्षण केले. त्यानंतर रेकि शिक्षकांनी गुरूतत्वाविषयीची त्यांची मनोगते व्यक्त केली. वेगवेगळ्या केंद्रातील साधकांनी मिळून भजनांचा अप्रतिम कार्यक्रम साजरा केला. त्यानंतर रेकिच्या पाच तत्वांनी गुंफीलेले ध्यान सर्व साधकांनी केले आणि या सर्व कार्यक्रमाच परमोच्च क्षण होता जेव्हा गुरुजींनी साधकांशी हितगुज साधले. त्याक्षणी गुरुजी प्रत्यक्षपणे आपल्याला घरात आल्याचा आनंद सर्वांना अनुभवता आला.

देवरुख आश्रमातही परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेऊन देवरुखच्या साधकांनी सप्तशतीचे पठण, स्वामी पादुकांवर रुद्राभिषेक व रुद्र एकादशणी करून गुरुपौर्णिमा शांततेत पण उत्साहाने साजरी केली.








## (२) देवरुख आश्रमात चैतन्याची झळाळी:

साधारण आश्रम वार्तामध्ये आपण आश्रमाच्या किंवा आपल्या संस्थेच्या कार्यक्रमांचे वर्णन देत असतो. परंतु कॉरोनाच्या भयावह परिस्थितीमध्ये बाहेरचे कार्यक्रम करणे शक्य होत नाही आहेत. परंतु ह्याच काळामध्ये मठामध्ये एका नव्या उत्साहाचे वातावरण तयार झाले आहे. आपणा सर्वांची लाडकी कालींदी आता आणखी एका बाळाची माता झाली आहे ही वार्ताच आपल्या साधकांना एका नव्या चैतन्याची अनुभूति देईल. नुकतेच कालींदीने 'शंभू' बाळाला जन्म दिला. कालींदीशिवाय तिच्याबरोबर आलेला पाच दिवसांचा 'मित्र' हे जरी गिर गाईंच्या जातिचे असले तरीही शंभू हा देवरूखच्या भूमिमध्ये जन्मलेला पहिला गिर जातीचा पाडा आहे ही आता ऐतिहासिक गोष्ट झाली आहे. मुळातच प्रेमळ असलेल्या कालींदीला तर आता प्रेमळपणा आणि करूणा यांचा पूरच आला आहे.







देवरूखच्या आपल्या साधकांनी ह्या चार महिन्याच्या काळात मठ इतका छान सांभाळला आहे कि त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच. आपले सर्वस्व पणाला लावून या मंडळींनी स्वामींची आणि मठाची देखभाल कशी केली आहे याची येथील काही छायाचित्रे साक्ष देतील. मला मठातून दररोज मठाच्या त्या त्या दिवसाची शोभा दाखवणारी छायाचित्रे श्री निलेश जोशी अगदी न चुकता पाठवित असतो. प्रत्येक चित्रागणिक माझ्या लक्षात येत आहे कि बाहेरच्या कॉरोनाच्या पडद्यामागे मठाने आपली कात टाकून एका नव्या चैतन्याची झळाळी दाखवायला सुरूवात केली आहे. स्वामींच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता आणी श्री दत्तांच्या अस्तित्वातील गूढता आणखीच गहरी व्हायला लागली आहे. आता कॉरोनाचा पडदा जरा सैल पडला कि मठात येणाऱ्या सेवेकऱ्यांना एका स्वर्गिय अनुभवाला सामोरे जायला मिळेल यात काहीच संशय नाही.



## (३) युवकांचे आंतरराष्ट्रिय शिबीर:

NGDI USA आणि DSPPL यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ९ जुलै ते २० जुलै २०२० (१२ दिवसांचे) ऑनलाईन युवक प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले. भारतातून तसेच अमेरिकेतून सहभागी झालेले युवक तसेच शिक्षक, अन दोहोंसाठी सोयीची सामायिक एकच वेळ, यांचा योग्य मेळ घालून, सदर शिबीर घेण्यात आले. सध्याच्या काहीश्या नकारात्मक वातावरणात 'सकारात्मकता' हा या शिबीराचा केंद्रबिंदू व प्रमुख संकल्पना होती. योगासने, दैनंदिन जीवनातील सकारात्मकता, मानवी भाव-भावनांचा अविष्कार, ध्यानधारणा, षटचक्रांचा अभ्यास, अग्निहोत्र, नेतृत्व गुणांचा विकास यासारख्या दररोज ५ अशा एकूण ६० सत्रांचा समावेश यामध्ये करण्यात आला होता. अजित सरांचे अमूल्य मार्गदर्शन, अमेरिकेत स्थायिक झालेल्या यशस्वी भारतीय निमंत्रितांचे युवकांसाठी प्रेरणादायी व्याख्यान व आंतरराष्ट्रिय ख्यातीच्या लिसा पॉवर्स व पार्वती देवी या विदुषीचा युवा मार्गदर्शनासाठीचा सहभाग ही ह्या शिबीराची ठळक वैशिष्ट्ये ठरली. या शिबीराच्या निमित्ताने, दैनंदिन जीवनात, प्रत्येक प्रसंगात शिकण्याची संधी दडलेली आहे अन, सकारात्मकतेने त्याचा आपल्या सर्वांगीण विकासासाठी आपण कसा उपयोग करून घेऊ शकतो, हा जणू यशाचा हुकमी मंत्रच युवकांपुढे प्रात्यक्षिकांद्वारे सादर केला गेला. सर्वच सहभागी युवकांनी, या प्रेरणादायी अन नवीन दृष्टीकोन देणाऱ्या शिबीराचे आयोजन केल्याबद्दल दोन्ही संस्थांचे आभार मानले व या सकारात्मक विचारांचा अन सदाचाराच्या जीवनपध्दतीचा यापुढील दैनंदिन जीवनात उपयोग करण्याचे निश्चित केले.



# अलौकीक 'भस्म महिमा'

यावेळी गुरुजींनी गुरुचरित्र सत्रात २९ व्या अध्यायाबद्दल सांगितले. 'भस्म महिमा' सांगणारा हा अध्याय म्हणजे आपल्यासाठी शिवांनी दिलेला औषधी प्रसादच जणू! सगळ्या प्रसादांमध्ये हा नक्कीच निराळा आहे. ज्याची महती शिवांनी स्वतःच 'भस्मांगराय' होऊन जगाला दाखवून दिली. शिवांना प्रिय असलेले हे भस्म आपण कसे ओळखावे हे विचारल्यावर गुरुजींनी सांगितले की, "**यज्ञ केल्यानंतर जे यज्ञकुंडात शेष राहते ते 'भस्म'**. मात्र यज्ञाव्यतीरिक्त इतर कोणत्याही कारणाने जळून शेष राहीलेल्या गोष्टीला 'राख' म्हटले जाते. यज्ञ करताना आपल्या गुरुंची, सिध्दांची, देवी-देवतांची, परंपरेची, संकल्प शक्ती असते. त्या संकल्प शक्तीनेच यज्ञ सिध्द होतो. जिथे अग्निदेवतेचे आव्हान केले जाते. अग्निदेवता ही व्यक्ताला (म्हणजे स्थूल रुपाला) अव्यक्ताकडे (म्हणजेच सूक्ष्माकडे) घेऊन जाणारी शक्ती आहे. यज्ञाद्वारे मूळ चैतन्याच्या स्वरुपाला अवतरित करण्याची ताकद असते. अशा यज्ञात जी समिधा अर्पिली जाते, त्यात दिव्य चैतन्याचा समावेश असतो; सगळ्यांचा आशीर्वाद असतो आणि त्यालाच 'भस्म' म्हटले जाते.

या भस्माला 'विभूती' असेही म्हणतात. "अंतरिक्षातून भूमीवर अवतरित झालेली शक्ती म्हणजेच 'विभूती'. 'वि' म्हणजे अंतरिक्ष, 'भू' म्हणजे भूमी आणि 'ती' म्हणजे अवतरित होणे. अशा दिव्य स्पंदनांच्या लहरिंनी युक्त असे 'भस्म' अथवा 'विभूती' जेव्हा आपण बाहय अंगावर धारण करतो, तेव्हा आपले आभामंडळ उच्च स्पंदनांच्या लहरींनी समृध्द होते. म्हणूनच की काय दक्षिणेकडील मंदिरांमध्ये प्रवेश करण्यापूर्वी आपल्या कपाळावर (आज्ञाचक्राचे ठिकाणी) विभूती लावण्याची प्रथा आहे. असे केल्याने आपले आज्ञाचक्र स्थिर होते आणि मंदीरातील उच्च अनुभूतींना आत्मसात करण्यास आपण तत्पर होतो.

'अग्निहोत्र', 'त्र्यंबक' असे छोटे यज्ञ सुध्दा उच्च स्पंदनांना अवतरित करतात. या उच्च लहरिंचा अनुभव आपण यज्ञाद्वारे करू शकतो. त्र्यंबक होमाचे भस्म बाह्य अंगावर लावता येते आणि अग्निहोत्राचे भस्म तर बाह्य अंगावर लावण्याबरोबर त्याचे सेवन करून आंतरिक शरिराचे शुध्दीकरणही उत्तमरित्या करता येते. अग्निहोत्राच्या भस्मावर तर अनेक शास्त्रज्ञांनी अभ्यास करून त्याचे औषधी स्वरूप मान्य केले आहे.

हे सुवर्ण ज्ञान मिळाल्यावर आपल्या साधकांनी आंनदीत होऊन गुरुजींना हे भस्म लावायचे कसे? याबद्दलही विचारले. आपल्या साधकांची उत्सुकता पाहून गुरुजींनी शास्त्रोक्त पध्दतीने भस्म कसे शरिरावर धारण करावे ते सांगितले. आपल्या उजव्या हाताची अनामिका, तर्जनी आणि मध्यमा अशा तीन बोटांनी आपल्या कपाळावर भस्माच्या तीन रेषा ओढाव्या. त्यावर आंगठयाने खालून वर जाणारा भस्माचाच टिका लावावा की 'त्रिपुंड' पूर्ण झाले. हे त्रिपुंड आपल्या आज्ञाचक्राला स्थिर ठेवण्यास आणि त्याची उर्जा उच्च स्पंदनांनी युक्त ठेवण्यास सहाय्यक ठरते. तसेच हे तीन बोटांनी लावलेले त्रिपुंड जेव्हा आपण दोन्ही हातांच्या मनगटावर आणि हातांच्या कोपऱ्याला लावल्यास शरिरातील रक्तदाब नियंत्रीत रहातो. साधनेतील प्रक्रियेद्वारे शरिराची उर्जा वाढते. त्यामुळे रक्तदाब वाढण्याची शक्यता असते. मात्र भस्म आपल्या हातांवरील ठराविक नसांवर लावल्यास रक्तदाब नियंत्रित रहातो. म्हणून तर अतिरुद्रामध्ये सगळे साधक भस्म लावून मगच रुद्र पठणाला सुरुवात करायचे.

किती अलौकीक आहे 'भस्म महिमा'! आणि किती समृध्द आहे आपले पुराण शास्त्र! प्रत्यक्ष शिवांनी वैरागी रुपात तर कधी गृहस्थ रुपात आपल्या भस्माचा महिमा साधकांना आणि गृहस्थाश्रमींना युगानुयुगे सांगितला आहे. कलीयुगातही दुष्ट शक्तींचा नाश करण्यास महादेवांचा हा 'भस्म' प्रसाद सगळ्यांच्या मुखी लागो.



नागेंद्रहाराय त्रिलोचनाय<br>
भस्मांगरागाय महेश्वराय ।<br>
नित्याय शुध्दाय दिंगबराय<br>
तस्मै नकाराय नमः शिवाय ॥